# कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी

## मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, जालना

भाकृअनुप
ICAR

# विकसित कृषि संकल्प अभियान, खरीप - २०२५

## जनावरांचे चारा व्यवस्थापन

पशूसंगोपन फायदेशीर करण्यासाठी त्यांचे आहार व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे असते. आहार व्यवस्थापनामध्ये सर्वात महत्वाचा घटक तो म्हणजे चारा व्यवस्थापन. जनावरांना विविध प्रकारचा चारा खाण्यास आवडतो. यामध्ये प्रामुख्याने एकदल व द्विदल चाऱ्याचा अंतर्भाव असतो. दररोजच्या आहारात एका दुधाळ जनावरासाठी २० ते २५ किलो हिरवा चारा व १० किलो वाळलेला चारा आवश्यक असतो. या चाऱ्यामध्ये ७०% एकदल व ३०% द्विदल चाऱ्याचे प्रमाण असणे आवश्यक असते. यासाठी पशुपालकांनी एका जनावराचे वार्षिक हिरवा चारा व्यवस्थापन सुरळीत करण्यासाठी १० गुंठे क्षेत्रावर चारा पिकाची लागवड करावी. यामध्ये ७ गुंठे क्षेत्रावर एकदल चारा जसे मका, कडवळ, नेपीयर गवताची लागवड करावी व ३ गुंठे क्षेत्रावरती द्विदल चारा जसे मेथी घास, दशरथ घास, बरशीम, पवठा, स्टायलो यांची लागवड करावी. अतिरीक्त चारा निर्मिती करीता शेतातील गायरान जमिनीवर, बांधावर व ओढ्याकाठी सुबाभूळ व तूती या झाडांची लागवड करावी.

वर्षभरात जनावरांना हिरवाचारा दररोज मिळणे दुधउत्पादनासाठी अत्यंत गरजेचे असते. यासाठी पशुपालकांनी सुधारीत नेपीयर चारा पिकांची लागवड शेतामध्ये जरूर करावी. दररोज एका दुधाळ जानवरांना १० ते १५ किलो नेपीयर चारा देता येतो. कमी क्षेत्रावर जास्त हिरवाचारा मिळवण्यासाठी नेपीयर चारापीक अत्यंत फायदेशीर आहे.

### नेपीयर चारा पिकांची वाण :

१) फुले गुणवंत    २) डीएचएन-६    ३) बीएनएच-१०
४) सुपर नेपीयर    ५) रेड नेपीयर    ६) सीओ-४

### जमिनीची मशागत :

खोल नांगरट करून २ ते ३ पाळ्या मारल्यानंतर चारापीक लागवडीस जमिन तयार होते.

### लागवडीचे अंतर :

नेपीयर चारा ठोंबे तयार करून ती खालील प्रकारे शेतात लागवड करावी.

| | | |
|---|---|---|
| भारी जमीन | - | ४ बाय २ फुट |
| मध्यम जमीन | - | ३ बाय २ फुट |
| हल्की जमीन | - | २ बाय २ फुट |

### लागवडीची वेळ :

| | | |
|---|---|---|
| पावसाळ्यात | - | जून ते ऑगस्ट |
| उन्हाळ्यात | - | फेब्रुवारी ते मार्च |

### खत व्यवस्थापन :

सुरूवातीला शेतात ४० ते ५० टन कुजलेले शेणखत एका हेक्टरमध्ये मशागत करतांना मिसळून द्यावे. ठोंब लागवड करतांना हेक्टरी ६० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व २५ किलो पालाश द्यावे. प्रत्येक कापणीनंतर २५ किलो नत्र व सेंद्रीय खते आळीपाळीने द्यावीत.

### पाणी व्यवस्थापन :

पाणी व्यवस्थापन हे जमिनीच्या पाणीधारण क्षमतेवर अवलंबून असते. साधारणपणे भारी जमिनीत उन्हाळ्यात लागवड करतांना सुरूवातीस २ दिवसांनी व त्यानंतर १० ते १५ दिवसांनी पाण्याच्या पाळ्या द्याव्यात तर पावसाळ्यात गरजेनूसार पाणी द्यावे.

### कापणी :

नेपीयर चाऱ्याची पहिली कापणी ६० ते ७० दिवसांनी करावी. यानंतरच्या कापण्या दर ३० ते ४० दिवसांनी कराव्यात. कापणी ही जमिनीपासून १५ ते २० सें.मी. अंतरावर करावी.

### चारा उत्पादन :

भारी जमिनीमध्ये पाणी व अन्नद्रव्य व्यवस्थापन उत्तम केल्यास एका हेक्टरमध्ये १५० ते २०० टन हिरवा नेपीयर चारा ६ ते ८ कापण्यात मिळतो.

### ठोंबाची उपलब्धता :

वरील नेपीयरचारा पिकांची ठोंबे कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी येथे उपलब्ध असून ते रू. १ प्रति ठोंब प्रमाणे मिळतात.

---

* लेखन व संकलन *
डॉ. एच. एम. आगे
(विषय विशेषज्ञ, पशुवैद्यकशास्त्र)
मो. ९०२८२५४९५०